**<u>गैरअर्जदार तर्फे साक्षीदार क्र. – १</u>** **<u>नि.दि.दा.क्र.४७/२०१६</u>**
**संगपाल विरुध्द यशवंत**
**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – ४६**

**उलटतपास वि.प. तर्फे वकील श्री. गजवे यांच्यातर्फे**

३. माझ्या घराच्या पुर्व बाजूस धनराज गेडाम यांचे घर असून त्यांच्या घराच्या अगोदर रस्ता आहे, उत्तरेस अर्जदाराचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की अर्जदाराच्या घराला लागून माझे घर आहे. अर्जदार व माझ्या घराच्या मध्ये नाली आहे, ती ३ ते ३.५० फूट आहे. मी या प्रकरणात माझ्या व अर्जदाराच्या घराची वस्तूस्थिती दाखविणारे फोटोग्राफ दाखल केले आहे. तसे फोटोग्राफ अभिलेखावर दाखल नाही.

४. मला आता निशाणी ३५ कडील फोटो दाखविण्यात आले. त्यामध्ये बांधकाम चालू असलेले घर हे माझे आहे. मला आता निशाणी ३६ कडील फोटो दाखविण्यात आले. त्यामध्येही माझ्या घराचे बांधकाम दिसून येते. हे म्हणणे खरे नाही की निशाणी ३६ मध्ये दिसत असलेले बांधकाम रस्त्यावर झाले आहे. मला आता निशाणी ३७ कडील फोटो दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की त्यामध्ये दिसत असलेला रस्ता माझ्या घराच्या डाव्या बाजूने जातो. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ३७ मध्ये दिसत असलेले घराचे बांधकाम हे माझ्या घराचेच आहे. ते बांधकाम मी करत होतो. मला आता निशाणी ४१ कडील फोटो दाखविला, त्यामध्ये दिसत असलेले घराच्या वरील बाजूचे बांधकाम माझ्याच घराचे आहे व ते मी केले आहे. हे म्हणणे खरे आहे की संगपाल याने माझ्या विरूध्द दावा दाखल केला असून त्याचा नंबर ४०/२०१६ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की दि.३०.०६.२०१६ रोजी न्यायालयाने मी घराचे बांधकाम करू नये असा आदेश केला आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या विरूध्द कोर्टाने मनाईचा आदेश दिला आहे. मी घर बांधकामासाठी नगर परिषदेकडून परवानगी घेतलेली नाही. माझ्या विरूध्द तसेच पृथ्वीराज मेश्राम व युवराम मेश्राम यांच्याविरूध्द महाराष्ट्र प्रादेशीक नगररचना कायदयातील तरतुदीनुसार गुन्हा क्र. १२/२०१७ चा दाखल झाला होता का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या विरूध्द न्यायालयाच्या अर्जदाराच्या घराच्या बाजुने बांधकाम करू नये असा मनाईचा आदेश असतानाही मी बांधकाम केले. हे म्हणणे खरे नाही की मी कोर्टाच्या आदेशाच्या विरोधात बांधकाम करून आदेशाचे उल्लंघन केले. हे म्हणणे खरे नाही की मी खोटया मजकूराचे प्रतिज्ञापत्र दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपासणी नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.08.08 17:06:49 +0530

कामठी
दिनांक ०७/०८/२०२५

( एम.आर. कामत )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी